# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**७६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०/११/२०२०**

**जिल्हा : धुळे**

| मागील आठवड्यातील हवामान (१३/११/२०२० ते १९/११/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानअंदाज (२१/११/२०२० ते २५/११/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३१ | ३१ | ३२ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | १७ | १६ | १७ | १८ | १८ |
| | | | | | | | ढगस्थिती (आकाश) | १ | १ | ० | ३ | २ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ३७ | ३४ | ४२ | ४१ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३१ | २८ | २३ | ३२ | २९ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १० | ९ | ८ | १० | १० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे. पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी. |
| संदेश | | |
| ऊस | पेरणीपूर्व तयारी | पूर्व हंगामी ऊस लागवड नोव्हेंबर अखेरीस पुर्ण करावी. त्याकरीता विद्यापीठाने विकसित केलेल्या जातींची निवड करावी.<br>बेणे प्रक्रिया: लागवडीपूर्वी बेण्यास ३०० मिली मेलेथिऑन किंवा २६५ मिली डायमेथोयेट किंवा १०० ग्रॅम बावस्टीन १०० लिटर पाणी या द्रावणात १० मिनिटांसाठी बेणे प्रकिया करावी. त्यानंतर १० किलो ॲसिटोबॅक्टर किंवा १ लिटर द्रवरूप ॲसिटोबॅक्टर + १.२५ किलो स्फुरद विरघळणारे जिवाणू + १०० लिटर पाण्यात बेणे ३० मिनीटे बुडवून ठेवावीत. |
| कापूस | वेचणी | कापसाची वेचणी सकाळी करणे अधिक चांगले , कारण हवेतील ओलाव्याने काडीकचरा , वाळलेली पाने कपाशीला चिटकत नाहीत. |
| हरभरा | रोप अवस्था | जमिनीत पडणाऱ्या भेगातून पाण्याचे बाष्पीभवन होते. जमिनीत ओलावा टिकून ठेवण्यासाठी व हवा खेळती राहण्यासाठी तसेच तणांचे नियंत्रण होण्याकरिता कोळपणी करून घ्यावी. |
| करडई | उगवण ते रोप अवस्था | रोप संख्या मर्यादीत ठेवणेकरीता १० ते १२ दिवसांनी दोन रोपांमध्ये २० सेमी अंतर ठेवून बाकीची झाडे काढून (विरळणी) टाकावीत. |
| रब्बी ज्वारी | पीक वाढीची अवस्था | गरजेप्रमाणे दुसरी खुरपणी करावी. पेरणीनंतर ८ आठवड्यांनी दातेरी कोळप्याने कोळपणी करून गरज पडल्यास दुसरे संरक्षित पाणी द्यावे. |
| कांदा | | कांदा या पिकावर फुलकिडे व करपा आढळून आल्यास लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ ईसी. ६ मिली. अधिक टेब्यूकोनॅझोल १० मिली अधिक स्टिकर १० मिली. प्रति १० लीटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. |
| मिरची | | या पिकावर सध्या बोकड्या (लिफ कर्ल), फळसड/ डायबॅक (फांद्या वाळणे), पानावरील ठिपके इत्यादी रोग आढळून आल्यास त्यासाठी फिप्रोनील १५ मिली किंवा थायोमेथोक्झाम ४ ग्रॅम अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम किंवा डायफेनॅकोनॅझोल १० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने फवारणी करावी. १० दिवसांच्या अंतराने या बुरशीनाशकांच्या आलटून-पालटून २ ते ३ फवारण्या कराव्यात. |
| टोमॅटो | | टोमॅटोवर करपा व फळसड दिसून आल्यास जमिनीवर पडलेली रोगग्रस्त पाने , फळे गोळा करून व्यवस्थित जाळून नष्ट करावीत ती बांधावर अथवा टोमॅटो प्लॉटशेजारी टाकू नये.<br>नियंत्रण : रोग नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने पाणी फवारणी करावी. पुढील फवारणी गरजेनुसार १०-१५ दिवसाच्या अंतराने |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | करावी. फळसड आणि उशिरा येणाऱ्या करपा रोगाच्या नियंत्रणासाठी वरील बुरशीनाशका व्यतिरिक्त मेटॅलॅक्झिल अधिक मॅन्कोझेब हे (संयुक्तग बुरशीनाशक) २५ ग्रॅम किंवा स्ट्रेप्टोमायसीन एक ग्रॅम + कॉपरऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हातपंपाने फवारणी करावी. फळ पोखरणा-या अळीचे नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन १० ईसी १० मिली किंवा इमामेक्टीन बेनझोएट २५ डब्लु.डी.जी. ४ ग्रॅम किंवा क्लोरॅनट्रॅनीलीप्रोल १८.५ एस्.सी. ३ मिली. किंवा फ्लूबेन्डामाईड ३९.३५ एस्.सी. ३ मिली प्रति १० लीटर पाण्यातून फवारणी करावी. सदरहू फवारणी दरम्यान ५ टक्के निंबोळी अर्काची अधून-मधून फवारणी करावी. |
| कोबी/ फुलकोबी | | पिकावर करपा (ब्लॅक लिफ स्पॉट) दिसून आल्यास मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्झिक्लो राईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे व तसेच घाण्या रोग (ब्लॅक रॉट) हा जीवाणूजन्य रोग आढळून आल्यास त्याचे नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम अधिक स्ट्रेप्टोमायसीन एक ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून साध्या हातपंपाने फवारणी करावी. तसेच कोबीवरील चौकोनी ठिपक्यांचा पतंग (डायमंड बॅक मॉथ) नियंत्रणासाठी स्पिनोसॅड २.५ एस.सी. १० मिली. किंवा इंडोक्झा१कार्ब १४.५ एस.सी. १० मिली किं वा क्लोरॅन्ट्रॅनीलीप्रोल १८.५ एस.सी. २ मिली. १० लीटर पाणी अधिक स्टिकर १० मिली एकत्र घेऊन फवारणी करणे. |
| वेलवर्गीय पिके | | या पिकांवर काळा करपा , केवडा (डाऊनी मिल्ड्यु) दिसून आल्यास त्याचे नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराइड २५ ग्रॅम किंवा मेटॅलॅक्झिल अधिक मॅन्कोझेब हे संयुक्त बुरशीनश क २५ ग्रॅम किंवा फोसेटील एएल २० ग्रॅम अधिक मॅन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पुढील फवारण्या दर १० दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार कराव्यात |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २०/११/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**